# पुणे महानगरपालिका

## जाहीर प्रकटन

**पुणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागासाठी खालील अस्थायी पदावर सहा महिन्यांकरिता करार पद्धतीने एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| अ. क्र. | पदाचा हुद्दा | एकवट मासिक मानधन रुपये | शैक्षणिक अर्हता | एकूण पदांची संख्या | गट |
|---|---|---|---|---|---|
| १. | सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक | १७,०८०/- | १. माध्यमिक शालान्त परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता.<br>२. शासनाकडील सर्वेअर कोर्स अगर सबओव्हरसीयर कोर्स अथवा तत्सम कोर्स उत्तीर्ण.<br>३. अनुभव सर्वेअर कामाचा ०५ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य | ४५ | अजा ६, अज ३, विजाअ १, भजब १, भजक २, भजड १, विमाप्र १, इमाव ९, सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग- ६, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक- ४, खुला ११ |

**वरील अस्थायी पदांकरिता खालील अटी व शर्ती राहतील.**

१. वरील दरमहा एकवट वेतनावर करार पद्धतीने नेमणुका करणेसाठी उमेदवारांचे त्यांचे प्राप्त अर्जामधील शैक्षणिक पात्रता, कामाचा अनुभव व इतर पात्रता यांचे आधारे परीक्षण करून त्यानुसार पात्र उमेदवारांना "objective assessment" पद्धतीने गुणांकन देऊन गुणानुक्रमे निवड व प्रतीक्षा यादी तयार करून ६ महिने कालावधीसाठी नेमणुका केल्या जातील.

"objective assessment" पद्धतीचा गुणांकन तक्ता खालीलप्रमाणे :

| एस.एस.सी. | आय.टी.आय. सर्व्हेअर | खाजगी अनुभव | सरकारी अनुभव | पुणे मनपातील अनुभव |
|---|---|---|---|---|
| २५ गुण | २५ गुण | १० गुण<br>प्रतिवर्षी २ गुण | १० गुण<br>प्रतिवर्षी २ गुण | ३० गुण<br>प्रति सहामाही ३ गुण |

२. वयोमर्यादा खुल्या वर्गातील उमेदवाराचे वय जाहीर प्रकटनाच्या दिनांकास ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. उमेदवाराकडे वर केलेली नमूद शैक्षणिक पात्रता व अनुभव आवश्यक आहे. तसेच सदर पदासाठी सादर केलेल्या अर्जासोबत एस.एस.सी. उत्तीर्ण, शासनाकडील अथवा मान्यताप्राप्त आय.टी.आय.कडील सर्व्हेअर कोर्स उत्तीर्ण, सर्व सेमिस्टरच्या गुणपत्रिका, प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र व अधिवास प्रमाणपत्र तसेच अनुभवाचे प्रमाणपत्राच्या छायांकित सत्यप्रतींचा एक संच स्वतःचा एक पासपोर्ट आकाराचा फोटोसहित सादर करणे आवश्यक आहे. वरीलपैकी कोणतीही कागदपत्रे अपूर्ण असल्यास आपला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. कागदपत्रे अपूर्ण असल्यास याबाबत आपणाशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४. महिला उमेदवार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

५. वरील पदांसाठी मा. उप-आयुक्त (अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग) पुणे महानगरपालिका, पुणे यांचे नावे अर्ज करून तो खालील कार्यालयामध्ये जाहीर प्रकटन प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत कार्यालयीन दिवशी (शासकीय सुट्ट्या सोडून) व कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत. (दि. १७/०२/२०२० ते दि. २७/०२/२०२० अखेर)

६. वरील पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांचे कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा. उप-आयुक्त, अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग, पुणे महानगरपालिका यांना राहील.

७. वरील नेमणुका या करार पद्धतीने ६ महिने मुदतीकरिता करण्यात येतील. तद्नंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्याकरिता पुन्हा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८. (उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.)

९. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१०. निवड प्रक्रियेचे अंतिम अधिकार मा. उप-आयुक्त, अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग, पुणे महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

११. निवड झालेल्या उमेदवारास स्वखर्चाने करारनामा करून घ्यावा लागेल.

१२. निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रूजू होण्यापूर्वी एक महिन्याचे एकवट वेतनाइतकी अनामत रक्कम म्हणून मनपा ट्रेझरीमध्ये भरावी लागेल. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१३. सदर नियुक्त्या एकवट वेतनावर करार पद्धतीने होणार असल्याने उमेदवारांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर कायमस्वरुपी हक्क सांगता येणार नाही. तसेच मनपा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ मिळण्यास ते पात्र ठरणार नाहीत.

१४. तसेच सदर जाहीर प्रकटन व अर्जाचा नमुना pmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. अर्जाची प्रिंट काढून अ. क्र. ३ प्रमाणे कागदपत्रे जोडून अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी समक्ष आणून द्यावा.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण : अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग, पुणे महानगरपालिका भवन, खोली क्र. ११९, पहिला मजला शिवाजीनगर, पुणे- ४११००५ येथे सकाळी १०.०० ते सायंकाळी ०४.०० वा. पर्यंत वरील अटी व शर्तीमधील अ. क्र. ५ मध्ये नमूद केल्यानुसार कार्यालयीन दिवशी सादर करावा. अर्जदार यांनी अर्जात त्यांचे नाव, पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता, लिंग, वय, जात, शैक्षणिक पात्रता, कामाचा अनुभव व संपर्क क्र. इत्यादी सर्व बाबी स्पष्टपणे नमूद करून अट क्र. ३ मध्ये नमूद गुणपत्रिका व शैक्षणिक व अनुभवाचे प्रमाणपत्रासहित सादर करावयात.**

**स्वाक्षरी/-**
**(माधव जगताप)**
**उप आयुक्त**
**(अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग)**
**पुणे महानगरपालिका**

जाहिरात क्र. १/१२७७
दि. १४/०२/२०२०